ARTHA (Commercial Weekly) Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ | पुणें, बुधवार तारीख १५ जून, १९६० | अंक १४

## विविध माहिती

**सहकार-मंत्र्यांची परिषद**—राज्य सरकारांच्या सहकार मंत्र्यांची एक परिषद् ता. १४ जूनपासून श्रीनगर येथें भरविण्यांत आली आहे. मध्यवर्ती सरकारच्या समाज-विकास खात्याचे मंत्री श्री. डे परिषदेचे अध्यक्ष आहेत. सहकारी शेतीच्या शक्याशक्यतेबद्दलचा अभ्यास करण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें नेमलेल्या मंडळाच्या अहवालाचा परिषदेंत विचार होईल.

**आस्वान धरणापासूनचा कालवा**—इजिप्तमध्यें बांधण्यांत येत असलेल्या आस्वान धरणापासून निघणाऱ्या कालव्याचें काम पहाण्यास पंतप्रधान नेहरू गेले होते. ह्या प्रसंगीं पं. नेहरूंनीं ८ टन दारू असलेला सुरुंग विजेची कळ दाबून उडवला. बटन दाबतांच २०,००० टन वजनाचा खडक फुटून त्याच्या ठिकऱ्या उडाल्या.

**आर्थिक आघाडीवरील युद्ध**—नाटो लष्करी संघटनेचे सेक्रेटरी जनरल, मि. पॉल हेन्री स्पाक, ह्यांनीं रशिआच्या आर्थिक आघाडीवरील चढाईविषयीं धोक्याचा इषारा दिला आहे. आशिआ व आफ्रिका खंडांत रशिआ मदतीच्या रूपानें आपले हातपाय पसरीत आहे व त्यामुळें ह्या भागांत कम्युनिझम पसरण्याची भीति आहे, असें त्यांचें मत आहे.

**काश्मीरमधील एंजिनिअरिंग कॉलेज**—काश्मीर राज्यांतील पहिलें एंजिनिअरिंग कॉलेज येत्या ऑगस्टपासून सुरू होणार आहे. हें कॉलेज भारत सरकारच्या शास्त्रीय खात्यानें स्थापन केलें असून त्यांत १२५ विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करण्यांत आली आहे. अभ्यासक्रम ५ वर्षांचा आहे. सध्या कॉलेजचे वर्ग बराकींतून भरविण्यांत येतील.

**केरळ राज्यांतील शिक्षकांना पेन्शन**—मलबारमधील प्राथमिक शाळांमधील शिक्षकांना लागू करण्यांत आलेली पेन्शनची योजना सर्व राज्यांत लागू करण्याचा विचार चालू आहे. मलबार मद्रास राज्यांत असतांना ती सुरू करण्यांत आली आहे. योजनेप्रमाणें प्राथमिक शिक्षकांना त्यांच्या सेवानिवृत्तीच्या पगाराच्या एकचतुर्थांश पेन्शन मिळते.

**केरळमध्यें सहकारी साखर कारखाना**—मध्यवर्ती सरकारच्या अन्न व शेतकी खात्यानें केरळ राज्यांत चित्तूर ह्या ठिकाणीं साखर कारखाना काढण्यास परवाना दिला आहे. हा कारखाना सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणार आहे. कारखान्यांत रोज १,००० टन ऊंस गाळण्यास समर्थ अशी यंत्रसामग्री बसविण्यात येईल. केरळमध्यें आणखीहि एका कारखान्यास परवाना देण्याचा विचार चालू आहे.

**पोलादाच्या नळांचें उत्पादन**—भारताच्या वाढत्या औद्योगिकरणामुळें पोलादाच्या नळांची मागणी एकसारखी वाढत चालली आहे. ती भागविण्यासाठी इंडिअन टय़ूब कंपनीनें कारखान्याचा विस्तार करण्याची योजना आंखली आहे. ती पूर्ण झाल्यावर कारखाना दरसाल १,८०,००० टन वजनाचे नळ उत्पादन करूं शकेल. सध्याचें वार्षिक उत्पादन १,००,००० टन वजनाचें आहे.

**तिसरा पंचवार्षिक कार्यक्रम**—भारत-सरकारचे उद्योगमंत्री श्री. मनुभाई शहा ह्यांनीं राजकोट येथें बोलतांना असें सूचित केलें कीं, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत उद्योगधंद्यांवर १,३०० कोटी रुपये आणि वीजपुरवठ्याच्या वाढीवर ९०० कोटी रुपये खर्च करण्यांत येतील. तिसऱ्या कार्यक्रमाच्या अखेरीस औद्योगिक यंत्रसामग्रीचें उत्पादन ३०० कोटी रुपयांपर्यंत जाईल असेंहि ते म्हणाले.

**आत्महत्येला कारण काय?**—दिल्लीजवळील सुप्रसिद्ध कुतुबमिनार ह्या मनोऱ्यावरून २६ वर्षे वयाच्या एका तरुणानें आत्महत्या केली. मनोऱ्यावरून उडी मारून करण्यांत आलेली ही १४९ वी आत्महत्या आहे. हा तरुण एका रेडिओच्या दुकानीं नौकरी करत होता व त्याला दरमहा रु. ५०० वेतन होतें, आणि तरीहि त्याला आयुष्याचा उबग आला होता.

**होमिओपॅथीचा प्रसार**—बंगलोर येथील होमिओपॅथिक कॉलेजच्या वर्षदिनानिमित्त मद्रासचे गव्हर्नर श्री. मंगळदास पक्वासा ह्यांनीं भाषण केलें. भारतामधील गरीब लोकांना वैद्यकीय मदत होण्याच्या दृष्टीनें होमिओपॅथी उपचार पद्धतीचा प्रसार ग्रामीण विभागांत करण्यांत आला पाहिजे, असें मत त्यांनीं व्यक्त केलें.

**अमेरिकेकडून मिळणारें धान्य**—अमेरिकेकडून भारताला मिळणाऱ्या १.७ कोटी अन्नधान्यापैकी १९६०-६१ सालीं किती धान्य आयात करावें ह्याविषयींची बोलणीं उभयता देशांत लवकरच सुरू होणार आहेत. भारतामधील पीकपाणी व धान्य साठविण्याची व्यवस्था ह्यांचा साल्लोसाल विचार करून आयात ठरविली जाणार आहे.

**रशियांतील विमान-वहातूक**—रशियानें आपल्या अंतर्गत विमान-वहातूकीसाठी नवी विमानें वापरण्यास प्रारंभ केला आहे. ही विमानें पूर्वीच्या विमानापेक्षा अधिक वेगाचीं आहेत. प्रत्येक विमानांत ३२ पासून ४० पर्यंत उतारू बसूं शकतात. विमानें ताशीं ३१५ मैल वेगानें १,३०० मैलांचा प्रवास न थांबतां करूं शकतात.



# तुमच्या मुलाची कॉलेजची फी आम्ही देऊं ....

समजा, आज तुमचं वय ३० वर्ष आणि तुमच्या मुलाचं १ वर्ष, तुमचा मुलगा कॉलेजांत जाऊं लागेल तेव्हां तुमचं वय ५० असेल. निरनिराळ्या वाढत्या कौटुंबिक अडचणीमुळें किंवा दुर्दैवानं त्यावेळीं तुम्ही हयात नसलात तर त्याचे कॉलेजचे शिक्षण होणें कठीण जाईल. पण ही अडचण आयुर्विमा पॉलिसी घेऊन तुम्ही सोडवूं शकाल. एकदा मुलाचे शिक्षणाकरितां पॉलिसी घेतली कीं, त्याचे शिक्षण निश्चित पूर्ण होईल. विमा जेवढा लवकर उतरवाल तितका हप्ताहि कमी बसेल, तेव्हां आजच विमा उतरवून आपल्या लाडक्याचा भविष्यकाळ निश्चित करा.

'आयुर्विम्याला दुसरा पर्याय नाहीं'



**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया**

Pratibha-60-1

**५०** वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

## ★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

## अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड

ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ

— वृ. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

## भारतीय पुस्तकांची निर्गत

### कोणत्या पुस्तकांना कुठें मागणी ?

भारतांतून गेल्या वर्षी पुस्तकें आणि छापील साहित्य मिळून एकूण सुमारें १ कोटी रु. किंमतीचें वाचन साहित्य परदेशांत निर्यात झालें. पाकिस्तान, ब्रह्मदेश, सिलोन, इंडोनेशिआ, मलाया, इंग्लंड, अमेरिका, थायलंड आणि सिंगापूर, कनिया व एडन या देशांकडे ही निर्यात झाली. पाकिस्तान, अमेरिका, जपान, हाँगकाँग, फिलिपाइन्स, थायलंड, ब्रह्मदेश, मलाया व ऑस्ट्रेलिआ यांसारख्या देशांत भारतीय पुस्तकांच्या खपास वाव आहे. पुस्तकांच्या आणि विशेषतः इंजिनिअरिंग व इतर तांत्रिक विषयांवरील पुस्तकांच्या स्वस्त किंमतीच्या आवृत्त्या काढल्यास कांहीं परदेशीय बाजारपेठांत त्यांना चांगली मागणी येईल. भारतीय कला, पुराणवस्तुशास्त्र, संस्कृति व जीवन यांसारख्या विषयांवरील सचित्र पुस्तकें परदेशांत अधिक प्रमाणांत खपतील, तर पश्चिम आशिआई देश व कांहीं इतर देशांत कुराणाच्या प्रतींची मोठ्या प्रमाणावर निर्यात करण्यास वाव आहे. तामिळ, गुजराती, उर्दू व बंगाली यांसारख्या भाषांतील पुस्तकांना परदेशांत मागणी येईल असें दिसून आलें आहे. कायदा, कादंबरी, चित्रपटसृष्टीला वाहिलेलीं मासिकें, नियतकालिकें, इंजिनिअरिंग बुक्स यांसारख्या पुस्तकांना पाकिस्तानांत सामान्यतः चांगली मागणी असते. विशेषतः पूर्व पाकिस्तानांत उर्दू आणि बंगाली भाषेंतील साहित्य, वाङ्मय व इंग्रजी क्रमिक पुस्तकें यांना चांगला वाव आहे. मलाया व सिलोन या देशांत तामिळ पुस्तकांचा खप होईल.

---

## बँकांतील तंट्यांच्या निवाड्यासाठी ट्रायब्यूनल

### आणखी १७ बँकांचीं प्रकरणें सुपूर्त

गेल्या मार्चमध्यें बँकांतील तंट्यांच्या निवाड्यासाठी ट्रायब्यूनल नेमण्यांत आलें, त्याच्याकडे आणखी १७ बँकांतील तंटे निवाड्यासाठी सोपविण्यांत आले आहेत. आंध्र बँक, अमेरिकन एक्सप्रेस कंपनी, बँक ऑफ नागपूर, बँक ऑफ टोकियो, बेळगांव बँक, गणेश बँक ऑफ कुरुंदवाड, इंडो कमर्शिअल बँक, मार्तंडम कमर्शिअल बँक, मिरज स्टेट बँक, सांगली बँक, स्टेट बँक ऑफ पतियाळा, स्टेट बँक ऑफ सौराष्ट्र, युनियन बँक ऑफ बिजापूर ॲन्ड सोलापूर, इत्यादींचा त्यांत समावेश आहे.

---

### पुणें सें. को. बँकेच्या देहू रोड कचेरीचें उद्घाटन

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.ची देहू रोड उपशाखा रानडे क्वार्टर्स, देहू रोड, या ठिकाणीं दि. ७ पासून सुरू झाली. ह्या उपशाखेचें उद्घाटन बँकेचे अध्यक्ष श्री. शिवाजीराव काळे यांचे शुभहस्तें झालें. पुणें महानगरपालिकेचे महापौर श्री. वा. ब. गोगटे यांचे हस्तें उद्घाटन करण्याचें ठरलें होतें; परंतु श्री. गोगटे हे कांहीं महत्त्वाच्या कामासाठी परगांवीं गेल्यामुळें ते या समारंभास उपस्थित राहूं शकले नाहींत.

या उद्घाटन प्रसंगीं सहकारी क्षेत्रांतील कांहीं प्रमुख कार्यकर्ते, देहू रोड येथील लष्करी अधिकारी, डेपोंतील सहकारी सोसायटीचे बहुसंख्य सभासद, देहू रोड येथील प्रतिष्ठित नागरिक आणि व्यापारी व बँकेचे संचालक अशी प्रमुख मंडळी हजर होती.

---

### पश्चिम बंगालमधील शेतीसाठी पाणीपुरवठा

पश्चिम बंगालमधील शेतजमिनीसाठी लागणाऱ्या पाण्याच्या पुरवठ्यांत वाढ करण्यासाठी तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ३,००० खोल ट्यूब-वेल्स खोदण्याचें राज्य सरकारनें ठरविलें आहे. युगोस्लाव्हिआ आणि पोलंड ह्या देशांनीं ह्या बाबतींत राज्य सरकारला मदत करण्याचें आश्वासन दिल्याचें समजतें. दोन्ही देश मदतीचा मोबदला रुपयाच्या चलनांत घेण्यास तयार आहेत. त्यामुळें परदेशीय चलनाचा प्रश्नहि आपोआप सुटणार आहे. तथापि ह्यासंबंधीं अद्याप वाटाघाटी चालू आहेत. प्रत्येक विहिरीनें २०० एकर जमिनीला पाण्याचा पुरवठा केला तर ह्या ३,००० विहिरींच्या साह्यानें पश्चिम बंगालमधील आणखी ६ लाख एकर जमिनीला हुकमी पाणीपुरवठा होऊं लागेल आणि परिणामीं राज्याच्या अन्नधान्याच्या उत्पादनांत चांगली भर पडेल. पश्चिम बंगालला अन्नधान्याच्या बाबतींत स्वयंपूर्ण करावयाचें असेल, तर आणखी ४० लाख एकर जमिनीच्या पाणीपुरवठ्याची सोय करणें जरूर आहे असा अंदाज करण्यांत आला आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ही गोष्ट करणें पैशाच्या दृष्टीनें शक्य होणार नाहीं. तथापि तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत २५ लाख एकर जमिनीला पाणीपुरवठा करतां येईल असा राज्य सरकारचा अंदाज आहे. ह्या कार्यक्रमांत शेतीवर व पाणीपुरवठ्यावर १२५ कोटी रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. बंगालमधील अन्नधान्याची दुर्लभता तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस बऱ्याच प्रमाणांत कमी होईल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे.

---

### फोनोग्रामचे पैसे भरण्याची नवी सोय

दिल्ली, मुंबई, मद्रास आणि कलकत्ता येथून करण्यांत येणाऱ्या फोनोग्रॅम्सचे पैसे ट्रंक टेलिफोन बिलांत समाविष्ट करण्यांत यावेत; पोस्टांत किंवा तारकचेरींत समक्ष जाऊन भरावे लागूं नयेत; अशी सोय करण्यांत येणार आहे.

---

### नॅशनल ट्रस्ट बँकेला परवाना नाहीं

रिझर्व्ह बँकेनें कलकत्त्याच्या नॅशनल ट्रस्ट बँक लि. ला लायसेन्स नाकारला आहे. त्यामुळें त्या बँकेला बँकिंगचा व्यवसाय करतां येणार नाहीं आणि ठेवी स्वीकारणें बंद करावें लागेल.

---

### ४% १९६०-७० कर्जरोखे

वरील कर्जरोख्यांच्या मुद्दलाची परतफेड १५ सप्टेंबर, १९६० रोजीं केली जाईल. त्यानंतर त्यावर व्याज मिळणार नाहीं. हे कर्जरोखे सरकारनें १९२६ मध्यें विक्रीस काढलेले होते.

---

**ग्रामपंचायती विम्याचें काम करणार ?**—ग्रामपंचायतींना आयुर्विम्याचे एजंट म्हणून काम करतां येईल काय, ह्या प्रश्नाचा ओरिसा सरकार विचार करीत आहे. ग्रामपंचायतींनीं हें काम केल्यास ग्रामीण भागांत विम्याचा प्रसार होईल व ग्रामपंचायतींचेंहि उत्पन्न वाढेल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. गेल्या वर्षी राजस्थानमधील ग्रामपंचायतींमार्फत १४० लाख रुपयांचा धंदा मिळाला असें म्हणतात.

**सोप्या सुटकेसाठी उपकरण**—बाळंतपणांत अडलेल्या स्त्रियांची त्वरित सुटका करण्यासाठी कधीं कधीं चिमट्याचा उपयोग करण्यांत येतो. पण, त्यामुळें मुलाला व बाळंतिणीला धोका पोंचण्याचा संभव असतो. ब्रिटनमध्यें मुलाला बाहेर काढण्यासाठी एका नवीन उपकरणाचा उपयोग करण्यांत येऊं लागला आहे. त्याच्या वापरांत कोणताहि धोका नसतो.

**गुजरातमध्यें खतांचा कारखाना**—गुजरात सरकारनें नेमलेल्या खतविषयक कमिटीकडून कल्याणपूर येथें एक खताचा कारखाना काढण्याची शिफारस करण्यांत येणार आहे. उत्तर गुजरातमध्यें व सौराष्ट्रांत बॉक्साइट व जिप्सम ह्या धातूंचे साठे सांपडल्यामुळें खतांच्या कारखान्यांची शक्यता वाढली आहे.

**गांधीसागर धरण**—चंबळ नदीच्या खोऱ्याचा विकास करण्यासाठीं बांधण्यांत येत असलेल्या गांधीसागर धरणाचें व वीज केंद्राचें काम झपाट्यानें पुरें करण्यांत येत आहे. ह्या कामाचें औपचारिक उद्घाटन बहुधा पावसाळा संपल्यावर करण्यांत येईल. धरणाच्या ह्या पहिल्या टप्प्यासाठीं ६३ कोटी रुपये खर्च येईल असा नवा अंदाज करण्यांत आला आहे.

**मुंबई-कलकत्ता विमान वाहतूक**—एअर इंडिया इंटरनॅशनल कंपनी मुंबई ते कलकत्ता ह्या मार्गावर बोइंग जेट विमानांच्या साह्यानें वाहतूक सुरू करण्याचा विचार करीत आहे. ह्या मार्गावरील प्रवासी वाहतुकीमुळें होणारें उत्पन्न वटून घेण्याच्या बाबतींत एअर इंडिया इंटरनॅशनल व इंडियन एअरलाइन्स कॉर्पोरेशन ह्यांच्यामध्यें वाटाघाटी चालू आहेत.

**मद्रास राज्याचा विकास**—सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. लोकनाथन् ह्यांच्याकडून मद्रास राज्याचा एक तांत्रिक-आर्थिक अहवाल राज्य सरकारनें करवून घेतला आहे. ह्या अहवालावर त्या राज्याच्या मंत्रिमंडळांत चर्चा करण्यांत आली. अहवालाच्या आधारानें राज्याची औद्योगिक विकास करण्याची योजना आखण्यांत येणार आहे.

**सुटे भाग मिळत नाहींत**—म्हैसूर राज्याच्या स्टेट ट्रॅन्सपोर्ट खात्याला बसेसच्या सुट्या भागांची तीव्र टंचाई भासत आहे. सुटे भाग न मिळाल्यामुळें वाहतूक करणाऱ्या १०० मोटारगाड्या बंद ठेवाव्या लागल्या आहेत. मध्यवर्ती सरकारकडून तात्पुरता परवाना घेऊन जरूर ते सुटे भाग मिळविण्याचा प्रयत्न राज्य सरकार करीत आहे.

**वैद्यकीय कॉलेजांत अधिक जागा**—मद्रास राज्यांतील चार वैद्यकीय कॉलेजमधील विद्यार्थ्यांची संख्या चालू सालीं वाढविण्यांत येण्याचा संभव आहे. गेल्या वर्षी ह्या चार कॉलेजांत मिळून ४२० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत आला होता. ह्या वर्षी ६०० विद्यार्थ्यांना प्रवेश देतां यावा अशी सोय करण्याची खटपट चालू आहे. ह्या बाबतींत लवकरच अधिकृत निवेदन काढण्यांत येईल.


**भूकंपविषयक परिषद्**—जुलै महिन्यांत जपानमधील टोकिओ शहरांत भूकंपविषयक परिषद् भरणार आहे. ह्या परिषदेंत १६ देशांतील ७० शास्त्रज्ञ भाग घेणार आहेत. भूकंपविषयक शास्त्राचा अभ्यास करून, भूकंपाला दाद न देणाऱ्या इमारती बांधण्याविषयीं परिषद् अहवाल तयार करणार आहे. चिली, मोरोक्को व इराणमध्यें भूकंपामुळें झालेल्या हानीचा अंदाजहि करण्यांत येईल.

**भिलई कारखान्यांतील रोजगार**—भिलई येथील पोलादाच्या कारखान्यासाठीं ज्यांची जमीन घेण्यांत आली आहे व जे सध्यां कारखान्यांत अनेक जागांवर काम करीत आहेत त्यांना कायम स्वरूपाच्या नोकऱ्या देण्याबाबत खास विचार करण्यांत येणार आहे. सध्यां हे लोक हंगामी स्वरूपाच्या जागांवर काम करीत आहेत.


कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक:—श्री. वा. काळे, संपादक, 'अर्थ'
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

श्री. वा. काळे ह्यांचीं
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तकें
१ कण आणि क्षण, २ पुढे पाऊल,
३ तुमचें स्थान कोणतें ?

महाराष्ट्रांतील व्यापारी शिक्षणाची आद्यसंस्था
डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स
( स्थापना १९१८ )
७१७ बुधवार पेठ, जिजामाताबागेजवळ, पुणें २.
टेलिफोन नं. २३६०
नवीन वर्षाकरितां सोमवार दि. २० जून १९६० पासून उघडेल.
जी. सी. डी., डी. कॉम्., जी. डी. सी. ॲन्ड ए., कॉस्टिंग डिप्लोमा ( ए. आय्. सी. डब्ल्यू. ए. ) अकौन्टन्सी, शॉर्टहँड, टाइपरायटिंग आणि पुणें विद्यापीठाचा एक्स्टर्नल प्री-डिग्री कॉमर्स कोर्स व एक्स्टर्नल बी. कॉम्. डिग्री कोर्स.
सकाळ संध्याकाळचे वर्ग
एस्. एस्. सी., मॅट्रिक, अंडरग्रॅज्युएटस् व ग्रॅज्युएटस् यांना योग्य असे अभ्यासक्रम.
माहितीपत्रक मोफत मिळेल.



आज बाजारात अनेक ब्राम्ही तेलें उपलब्ध आहेत; परंतु ब्राम्ही तेलाच्या मूळ कल्पनेचें श्रेय सांडू बंधूनाच द्यावें लागेल. सांडू बंधूंच्या आयुर्वेदावरील प्राचीन ग्रंथांच्या गाढ्या व्यासंगाचें तें फळ आहे. ह्या ग्रंथांतून 'ब्राम्ही' या अल्पमोली परंतु बहुगुणी वनस्पतीचा, मेंदूच्या अगर उष्णतेच्या विकारांवर उपयोग सांगितला आहे. त्यांवरूनच श्री. दत्तात्रेय कृष्ण सांडू यांना ब्राम्ही वनस्पतीयुक्त तेल करण्याची कल्पना सुचली. औषधी म्हणून अथवा एरव्हीं सुगंधी तेल म्हणून लावण्यास उपयोगी पडणारें बहुगुणी तेल तयार करण्यासाठीं त्यांनीं प्रयोग सुरू केले व भारतांत प्रथमच "ओरिजिनल ब्राम्ही तेल" तयार करून तें लोकप्रिय केलें.

आर्य-वैद्यकाच्या इतिहासांतील महत्वाचें पान

१८९९-१९६०

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रा. लि. चेंबूर-मुंबई ७१

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रायव्हेट लि. हीरक महोत्सव

# अर्थ

बुधवार, ता. १५ जून, १९६०



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## खाण्याच्या संवयी बदलण्याची जरूरी

भारत सरकारचे अन्नमंत्री श्री. एस. के. पाटील अमेरिकेचा दौरा संपवून भारतांत परत आले आहेत. त्यांच्या दौऱ्याची फलनिष्पत्ति म्हणून अमेरिकेकडून मिळणाऱ्या अन्नधान्याच्या मोठ्या मदतीकडे बोट दाखवितां येईल. दौऱ्याहून परत आल्यावर श्री. पाटील ह्यांचा मुंबई येथील इंडो-अमेरिकन सोसायटीतर्फे सत्कार करण्यांत आला. त्याप्रसंगीं भाषण करतांना श्री. एस. के. पाटील म्हणाले कीं, भारतांत अन्नधान्याचें उत्पादन पुरेसें होत आहे. परंतु लोकांच्या खाण्याच्या संवयी अशा कांहीं बनल्या आहेत कीं, त्याच्यामुळें अन्नधान्याचा तुटवडा भासतो. ह्यावर उपाय म्हणजे लोकांनीं आपल्या खाद्यपदार्थांच्या आवडीनिवडीवर नियंत्रण ठेवून त्या गरजेप्रमाणें बदलल्या पाहिजेत; म्हणजे अन्नधान्याचा तुटवडा भासणार नाहीं. पण, ह्या बाबतींत तपशीलवार सूचना त्यांनीं केल्या नाहींत. अन्नधान्याचा साठा देशांत भरपूर असला म्हणजे लोकांना निश्चितपणा वाटेल. त्याचा परिणाम असा होईल कीं, अन्नधान्याचा साठा करण्याची प्रवृत्ति कमी होईल व अन्नधान्याच्या किंमती भडकण्यास आळा बसेल. ही गोष्ट लक्षांत घेऊनच अमेरिका व कॅनडा ह्या देशांशीं अन्नधान्याच्या पुरवठ्याच्या बाबतींत दीर्घ मुदतीचे करार करण्यांत आले आहेत. अन्नधान्याच्या पुरवठ्याचे करार घडवून आणण्याच्या बाबतींत प्रे. आयसेनहोअर ह्यांनीं महत्त्वाची मदत केलेली आहे. येत्या पांच वर्षांच्या कालावधींत भारताला अन्नधान्याच्या बाबतींत स्वयंपूर्णता प्राप्त करून घेणें आवश्यक आहे. आणि हें करणें अशक्य आहे असें मुळींच नाहीं. मात्र ह्या बाबतींत यश येण्यासाठी शेतीच्या आधुनिक पद्धतींचा अवलंब करण्यांत आला पाहिजे.

## बिहारमध्यें दूधदुभत्याच्या पदार्थांचा कारखाना

बिहारमधील मोंघीर जिल्ह्यांत बरौनीजवळ दूधदुभत्याचे पदार्थ तयार करण्याचा एक कारखाना काढण्यांत येणार आहे. ह्या कारखान्यासाठीं ७·६० लाख रुपये खर्च येणार असून त्यांत क्रीम, लोणी व तूप ह्यांचें उत्पादन करण्यांत येईल. कारखान्यांत रोज ४,००० पौंड क्रीम तयार होईल. दरसाल सुमारें ८ लाख पौंड लोणी व तूप ह्यांचेंहि उत्पादन करण्यांत येईल. बरौनी व बेगुसराई ह्या गांवांना दुधाचा पुरवठाहि कारखान्यामधून करण्याची व्यवस्था होत आहे. दुधाची भुकटी तयार करण्याच्या कामालाहि हळूहळू हात घालण्यांत येईल. दुधाचा धंदा करणाऱ्या लोकांचें जीवनमान सुधारण्याच्या दृष्टीनें हा कारखाना काढण्यांत येत आहे. हा धंदा करणाऱ्या गवळ्यांच्या दुधाला हुकमी गिऱ्हाईक त्यामुळें मिळणार आहे. कारण, कारखान्यासाठी लागणारें दूध वाजवी किंमत देऊन विकत घेण्यांत येणार आहे. ह्या कारखान्यासाठी मध्यवर्ती सरकारच्या शेतकी खात्यानें आर्थिक मदत देण्याचें ठरविलें आहे. अमेरिकेच्या तांत्रिक सहकार्य मंडळाकडून कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामग्री पुरविण्यांत येणार आहे. यंत्रसामग्रीची किंमत १·८० लाख रुपये असेल. १९६१–६२ मध्यें कारखान्यांत प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ होईल. कारखान्यासाठी लागणारें दूध १०० वर खेडेगांवांतून गोळा करण्यांत येईल. हें काम करण्यासाठी ठिकठिकाणीं केंद्रें उघडण्यांत येतील. कारखान्यांत तयार झालेला माल भारताच्या पूर्व भागांत म्हणजे मुख्यतः पश्चिम बंगाल, आसाम, बिहार, ओरिसा व उत्तर प्रदेश, ह्या राज्यांतील बाजारपेठांतून विक्रीसाठी पाठविण्यांत येईल.

## तेलाच्या शोधासाठी रशिआची मदत

खनिज तेलाच्या बाबतींत शक्य तितकी स्वयंपूर्णता प्राप्त करून घेण्यासाठी भारत सरकार प्रयत्न करीत आहे. तेलाच्या खाणींचा शोध, अशुद्ध तेलाची आयात आणि तेलाचें शुद्धीकरण ह्यासाठी सरकारनें कार्यक्रम आंखला असून तो पार पाडण्यासाठी परदेशांची मदत घेण्यांत येत आहे. ह्या बाबतींत रशिअन सरकारशीं वाटाघाटी करण्यासाठी मध्यवर्ती सरकारचे खाणी व तेलमंत्री के. डी. मालवीय रशिआला गेले आहेत. अलीकडे रशिआनें भारताला पेट्रोल व पेट्रोलचे पदार्थ आणि अशुद्ध तेल पुरविण्याची तयारी दाखविली होती. रशिआकडून तेल आयात करण्याविषयीं व तेलाच्या अधिक संशोधनासाठी वाटाघाटी करण्यासाठी श्री. मालवीय रशिआला गेले आहेत. रशिअन तेलाची आयात व त्याचें वांटप हें काम करण्यासाठी एक खाजगी मालकीची कंपनी पुढें आली होती; परंतु तिचे ह्या बाबतचे प्रयत्न यशस्वी झालेले नाहींत. तेलाची किंमत रशिआ रुपयाच्या चलनांत घेण्यास तयार असल्याचें समजतें. रशिआकडून अशुद्ध तेल आयात करण्याच्या वाटाघाटी जर यशस्वी झाल्या तर भारताच्या परदेशीय चलनाच्या खर्चांत ताबडतोब मोठी बचत होऊं लागेल. शिवाय त्यामुळें भारतांत पेट्रोल व पेट्रोलच्या पदार्थांच्या किंमती उतरविणें कांहीं काळानें शक्य होणार आहे. तथापि, भारतामधील खाजगी मालकीच्या कंपन्यांना रशिअन तेलाची आयात करावयास लावतां येण्यासारखें नाहीं. अशी आयात करणें ही गोष्ट सर्वस्वीं त्यांच्या मर्जीवर अवलंबून राहील. ह्या बाबतींत त्यांच्याशीं विचारविनिमय करण्यांत येत आहे. त्याचप्रमाणें तेलशुद्धीच्या कारखान्यांना रशिअन तेल कितपत मानवेल ह्याचाहि अभ्यास करण्यांत येत आहे.

## आणखी १३ मध्यवर्ती गुदामें

चालू आर्थिक वर्षांत देशांत आणखी १३ ठिकाणीं (अडोनी, गुलबर्गा, क्विलॉन, शिमोगा, अमृतसर, नन्दियाळ, राजकोट, भडोच वा सुरत, कटक, शिरसी, गोहत्ती, थिओग व रतलाम वा भाटिंडा या ठिकाणीं) मध्यवर्ती गुदामें उघडण्याचा सेंट्रल वेअर हौसिंग कॉर्पोरेशनचा विचार आहे. देशांत सध्यां अशीं २७ गुदामें आहेत.

# BANK OF

## BALANCE SHEET AS

| 1958 | CAPITAL & LIABILITIES | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| | **1. Capital:** | | |
| | *Authorised Capital:* | | |
| 50,00,000 | 50,000 Shares of Rs. 100/- each ... | 50,00,000—00 | |
| | *Issued Capital:* | | |
| 25,00,000 | 25,000 Shares of Rs. 100/- each ... | 25,00,000—00 | |
| | *Subscribed Capital:* | | |
| 25,00,000 | 25,000 Shares of Rs. 100/- each. ... | 25,00,000—00 | |
| 12,50,000 | Amount called up at Rs. 50/- per Share. ... | 12,50,000—00 | |
| | Less Calls Unpaid. ... | Nil | |
| | Add Forfeited Shares. ... | Nil | 12,50,000—00 |
| 34,500 | **2. Reserve Fund & Other Reserves:** ... | | 34,500—00 |
| | **3. Deposits and Other Accounts:** | | |
| 4,56,820 | Fixed Deposits. ... | 5,18,444—18 | |
| 6,25,714 | Savings Bank Deposits ... | 6,96,790—37 | |
| 4,35,892 | Current Accounts and Contingency Accounts etc. ... | 5,31,943—03 | 17,47,177—58 |
| 15,18,426 | | | |
| | **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.:** | | |
| Nil | (1) In India. ... | Nil | |
| Nil | (2) Outside India. ... | Nil | |
| | *Particulars:* | | |
| Nil | (i) Secured ... | Nil | |
| Nil | (ii) Unsecured. ... | Nil | Nil |
| Nil | **5. Bills Payable:** ... | | 34—06 |
| | **6. Bills for Collection, (being Bills Receivable as per contra):** | | |
| 55,625 | (1) Payable in India. ... | 53,473—50 | |
| Nil | (2) Payable outside India. ... | Nil | 53,473—50 |
| 55,625 | | | |
| | **7. Other Liabilities:** | | |
| 704 | (1) Provision for Income tax. ... | 3,046—62 | |
| 1,045 | (2) Outstanding Liabilities for Expenses. ... | 857—00 | |
| 124 | (3) Income Received in Advance. ... | Nil | |
| Nil | (4) Branch Adjustments ... | 11,410—59 | 15,314—21 |
| 1,873 | | | |
| Nil | **8. Acceptances, Endorsements and Other Obligations as per contra:** ... | | Nil |
| Nil | **9. Contingent Liabilities:** ... | | Nil |
| 28,60,424 | Total Rs. ... | | 31,00,499—35 |

# POONA LIMITED.

**AT 31st DECEMBER 1959.**

| 1958 | PROPERTY & ASSETS | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| | **1. Cash:** | | |
| 2,81,012 | In hand, with Reserve Bank and State Bank (including foreign currency notes) ... | | 2,79,060—80 |
| | **2. Balances with other Banks: (On Current Account)** | | |
| 1,61,298 | (i) In India ... | 2,19,876—60 | |
| Nil | (ii) Outside India ... | Nil | 2,19,876—60 |
| Nil | **3. Money at Call and Short Notice** ... | | 1,30,000—00 |
| | **4. Investments: (At Book Value)** | | |
| 5,99,202 | (1) Securities of the Central and State Governments and other Trustee securities, including Treasury Bills of the Central and State Governments of the face value of Rs. 6,01,300/- (Market Value Rs. 5,86,871—60) ... | 5,99,202—25 | |
| 6,069 | (2) Shares Ordinary fully paid (Market Value) Rs. 3,444-28. Shares of the book value of Rs. 290-28 are not quoted on the stock exchange, ... | 6,069—53 | |
| Nil | Partly paid ... | Nil | |
| Nil | Deferred fully paid ... | Nil | |
| Nil | (3) Debentures or Bonds ... | Nil | |
| Nil | (4) Other Investments ... | Nil | |
| Nil | (5) Gold ... | Nil | 6,05,271—78 |
| 6,05,271 | | | |
| | (Government Securities of the face value Rs. 6,00,000/- are lodged with other Banks for advance facilities). | | |
| | **5. Advances:** | | |
| | (Other than Bad and Doubtful Debts for which provision has been made to the satisfaction of the auditors subject to particulars under clause (4) below): | | |
| | (1) *Loans, Cash Credits and Overdrafts.* | | |
| 15,25,783 | (1) In India ... | 14,69,169—50 | |
| Nil | (2) Outside India ... | Nil | |
| | (2) *Bills, Discounted and Purchased* (Excluding Treasury Bills of Central and State Governments.) | | |
| 8,111 | (1) Payable In India ... | 29,212—54 | |
| Nil | (2) Payable outside India ... | Nil | 14,98,382—04 |
| 15,33,894 | | | |
| | **Particulars of Advances:—** | | |
| 9,95,296 | (1) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured ... | 9,86,328—96 | |
| 2,10,110 | (2) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security ... | 1,97,630—26 | |
| Nil | (3) Debts considered good, secured by personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the debtors ... | Nil | |
| 3,28,488 | (4) Debts considered doubtful or bad, not provided for. | 3,14,422—82 | |
| 15,33,894 | | 14,98,382—04 | |
| 47,794 | (5) Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | 50,705—21 | |
| Nil | (6) Debts due by Companies or Firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents, or in the case of private companies as Members. ... | 10,384—22 | |
| 25,81,475 | Carried Over ... | | 27,32,591—22 |

# BANK OF
BALANCE SHEET AS

## PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ended 31st December, 1959

| 1958 | EXPENDITURE | Rs. nP. | 1958 | INCOME (Less Provision made during the year for Bad and Doubtful Debts and for other usual or necessary provisions.) | Rs. nP. |
|---|---|---|---|---|---|
| 36,937 | To Interest paid on Deposits, Borrowings etc. ... | 39,573—13 | 54,382 | By Interest and Discount. ... | 1,09,235—24 |
| | „ Salaries and Allowances and Provident Fund ... | | 2,812 | „ Commission, Exchange and Brokerage. ... | 2,338—27 |
| 6,930 | (1) Manager 7,480—00 | | Nil | „ Rent ... | Nil |
| 26,709 | (2) Staff 29,172—45 | 36,682—45 | | | |
| 33,689 | | | | | |
| Nil | „ Directors' and Local Committee Members Fees and allowances. ... | Nil | Nil | „ Net Profit on sale of Investments, Gold, Silver, Land, premises and other Assets (not credited to Reserve or any particular Fund or Account.) ... | Nil |
| 6,248 | „ Rent, Taxes, Insurance, Lighting etc. ... | 6,776—93 | | | |
| 1,728 | „ Law Charges. ... | 3,117—45 | | | |
| 3,399 | „ Postage, Telegrams and Stamps. ... | 2,306—63 | Nil | „ Net Profit on Revaluation of Investments, Gold and Silver, Land, Premises and other Assets (not credited to Reserve or any particular Fund or Account.) ... | Nil |
| 1,000 | „ Auditors' Fees ... | 800—00 | | | |
| 1,794 | „ Depreciation on and repairs to the Banking Company's Property. ... | 1,725—38 | 12 | „ Income from Non-Banking assets and Profit from sale of or dealing with such assets. ... | 1,273—25 |
| 2,953 | „ Stationery, Printing, Advertisement, etc. ... | 4,706—94 | 1,547 | „ Other Receipts ... | 1,660—27 |
| Nil | „ Expenses on Non-Banking Assets. ... | 4,102—93 | 33,725 | „ Net loss for the year. ... | Nil |
| | „ Other Expenditure. ... | | | | |
| 704 | „ Incom Tax for the years 1957-58 3,046-62 | | | | |
| 4,026 | „ Other Expenditure, 2,820-87 | 5,867—49 | | | |
| Nil | „ Profit for the year subject to Taxation. ... | 8,777—70 | | | |
| 92,478 | Total Rs. ... | 1,14,407—03 | 92,478 | Total Rs. ... | 1,14,407—03 |

## AUDITORS' REPORT TO THE SHARE-HOLDERS

We have audited the foregoing Balance Sheet of Bank of Poona Ltd., as at 31st December, 1959 and also the annexed Profit and Loss Account of the Bank for the year ended on that date in which are incorporated the audited returns of all Branches of the Bank.

In accordance with the provisions of Section 29 of the Banking Companies Act, 1949, read with proviso to Sub-section (1) and (2) of Section 211 and Sub-section (5) of Section 211 and Section 227 (5) of the Companies Act. 1956, the Balance Sheet and Profit and Loss Account are not required to be and are not drawn up in accordance with Sixth Schedule of the Companies Act, 1956. The Accounts are, therefore, drawn up in conformity with Form A and B of the Third Schedule to the Banking Companies Act, 1949.

We report that:—

(a) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory.

(b) The transactions of the Bank which have come to our notice, have been within the powers of the Bank.

(c) In our opinion, proper books of accounts as required by Law have been kept by the Bank so far as appears from our examination of those books and proper returns adequate for the purpose of our audit have been received from the Branches of the Bank.

(d) The Bank's Balance Sheet and the Profit and Loss Account dealt with by this report are in agreement with the books of account and returns.

(e) In our opinion, and to the best of our information, and according to the explanation given to us the said accounts give the information required by the Companies Act, 1956 in the manner so required for Banking Companies and on such basis the said Balance Sheet, read along with the notes appearing thereon, gives a true and fair view of the state of affairs of the Bank as at 31st December, 1959, and the Profit and Loss Account gives a true and fair view of the profit for the year ended upto that date.

Poona,
13th April, 1960.

P. G. BHAGWAT
*Chartered Accountants.*

# POONA LIMITED.

**AT 31st DECEMBER 1959.**

| 1958 | PROPERTY & ASSETS | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| 25,81,475 | Brought Forward ... | | 27,32,591—22 |
| 47,794 | (7) Maximum total amount of advances including temporary advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | 50,705—11 | |
| Nil | (8) Maximum total amount of advances including temporary advances granted during the year to the Companies or Firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners, or Managing Agents, or in the case of private Companies, as Members. ... | 14,097—58 | |
| Nil | (9) Due from Banking Companies ... | Nil | |
| | **6. Bills Receivable, Being Bills for Collection as per contra** | | |
| 55,625 | (1) Payable in India ... | 53,473—50 | |
| Nil | (2) Payable outside India ... | Nil | 53,473—50 |
| Nil | **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and Other Obligations as per contra** ... | | Nil |
| Nil | **8. Premises Less Depreciation** ... | | Nil |
| | **9. Furniture and Fixtures Less Depreciation :** | | |
| | At Cost as per last Balance Sheet ... | 50,778—42 | |
| | Less : Sales ... | 153—62 | |
| | | 50,624—80 | |
| | Less : Depreciation up to 31-12-58. Rs. 23,778-42 | | |
| 27,000 | For the year Rs. 1,626-38 | 25,404—80 | 25,220—00 |
| | **10. Other Assets Including Silver :** | | |
| 19,000 | (1) Land at cost ... | 19,000—00 | |
| | (2) Vehicle (Depreciated cost) Rs. 260-00 | | |
| 260 | Less Depreciation for the year Rs. 52-00 | 208—00 | |
| 795 | (3) Stationery stock ... | 513—00 | |
| 116 | (4) Stamp ... | 92—11 | |
| 5,675 | (5) Interest accrued on Investments ... | 7,021—83 | |
| 21979 | (6) Tax deducted at source. ... | 20,022—67 | |
| 511 | (7) Prepaid expenses. ... | 505—75 | |
| 28 | (8) Income due but not received. ... | 100—00 | |
| 9,254 | (9) Advances for expenses to Pleaders. ... | 6,476—75 | |
| 1,061 | (10) Branch Adjustment. ... | Nil | 53,940—11 |
| 58,679 | | | |
| 31,721 | **11. Non-Banking Assets Acquired in Satisfaction of Claims** ... | | 1,38,127—94 |
| | **12. Profit and Losss Account :** | | |
| 72,199 | Balance of Loss as per last year's account ... | 1,05,924—28 | |
| 33,725 | Add Loss for the year | Nil | |
| 1,05,924 | | 1,05,924—28 | |
| Nil | Less Profit for this year ... | 8,777—70 | 97,146—58 |
| 1,05,924 | | | |
| 28,60,424 | Total Rs. ... | | 31,00,499—35 |

D. R. Naik, *Chairman.*

P. G. Bhagwat
*Chartered Accountants.*

N. B. Parulekar
F. P. Pocha
G. K. Naik
} *Directors*

G. G. Sathe.
*Manager*

# BANK OF POONA LIMITED.

## FOURTEENTH REPORT.

Fourteenth Report of the Board of Directors to be submitted to the Shareholders at the Fourteenth Ordinary General Meeting to be held at the Registered Office of the Bank, 453, Raviwar Peth Poona City, on Thursday, the 9th June, 1960 at 4 o'clock in the afternoon.

The Directors beg to submit to the Shareholders the Balance Sheet as at and Profit and Loss Account for the year ended 31st December 1959, of the Bank duly certified by the Auditors.

INCOME–During the year under report the gross earning of the Bank amounted to Rs. 1,14,407–03 as against Rs. 58,753–57 for the last year. The increase in the income is due to the interest having been charged on certain accounts under decretal debts where there were recoveries. The advances figure remains almost steady.

EXPENDITURE–As for the expenditure the total expenses including interest paid on deposits and borrowing, establishment charges, law and other charges amounted to Rs. 1,05,629–33 as against Rs. 92,478–46 for the previous year. The increase is in the amount of interest paid on deposits (due to the increase in deposits) and also under the other expenses including, law establishment and other charges.

In terms of article No. 118 of the Bank, Shri D. R. Naik, retires by rotation, but being eligible offers himself for re-election. Pursuant to the provisions of sections 280 and other applicable provisions (if any) of the Companies Act 1956 Shri F. P. Pocha who attains the age of 65 retires and is eligible subject to compliance with the provisions of section 281 of the Companies Act and as such he offers himself for re-election.

The Shareholders are requested to appoint Auditors and to fix their remuneration.

The present Auditors M/S P. G. Bhagwat are eligible for re-election.

The Directors thank the Shareholders, Customers, Constituents and the Staff of the Bank for their help and co-operation.

D. R. NAIK — *Chairman.*

N. B. PARULEKAR, F. P. POCHA, G. K. NAIK — *Directors.*

G. G. SATHE. — *Manager.*

Poona City.
9th April, 1960.

---

**काश्मीरचा औद्योगिक विकास**—काश्मीरचे पंतप्रधान बक्षी गुलाम महंमद ह्यांनीं असें आश्वासन दिलें आहे कीं काश्मीरमध्यें त्या राज्यांतील अगर राज्याबाहेरील उद्योगपतींनीं भांडवल गुंतविलेल्यास कोणत्याहि प्रकारचा धोका राहणार नाहीं. उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण करण्याचा मुळींच विचार नाहीं.

**इतिहासकाराची देणगी**—सुप्रसिद्ध इतिहासकार डॉ. सुरेंद्रनाथ सेन ह्यांनीं आपल्याजवळील दुर्मीळ पुस्तकांचा संग्रह कलकत्त्याच्या नॅशनल लायब्ररीला देणगी म्हणून दिला आहे. ह्या संग्रहांत ३९२ मराठी पुस्तकें असून ती मेराठ्यांच्या इतिहासाच्या दृष्टीनें फार मोलाची आहेत. डॉ. सेन ७१ वर्षांचे आहेत.

**तुंगभद्रा नदीवरील पूल**—कुर्नूलजवळ तुंगभद्रा नदीवर बांधण्यांत येत असलेल्या पुलाचें काम चालू महिन्याच्या अखेरपर्यंत पुरें होईल. पुलासाठीं २० लाख रु. खर्च होईल असा अंदाज आहे. ह्या पुलाची लांबी २,१५० फूट असून त्यामुळें रायलसीमा जिल्हा आणि आंध्रची राजधानी ह्यांच्यांत थेट दळणवळण होऊं शकेल. सध्यां असा रस्ता नाहीं.

**देहू येथें नवें इस्पितळ**—पुण्यापासून १५ मैलांवर देहू येथें एक नवीन कँटोन्मेंट जनरल हॉस्पिटल चालू करण्यांत आलें आहे. इस्पितळांत सर्व आधुनिक वैद्यकीय उपकरणें असून त्यासाठीं सुमारें १ लाख रुपये खर्च आला. इस्पितळांत २० रुग्णशय्या आहेत. त्याचा विस्तार ३ एकरांवर पसरलेला आहे.

**जाव्हाला रशिआची मदत**—इंडोनेशिआंतील पश्चिम जाव्हांत एक पोलादाचा कारखाना काढण्यासाठीं रशिआनें आर्थिक मदत देण्याचें कबूल केलें आहे. ह्यासंबंधीच्या करारावर उभय पक्षांनीं सह्या केल्या. रशिआनें दिलेल्या १० कोटी डॉलर्स पैकीं ६ कोटी डॉलर्स ह्या कारखान्यासाठीं खर्च व्हावयाचे आहेत.

**तिबेटमध्यें पोलादाचा कारखाना**—तिबेटची राजधानी ल्हासा येथें पोलादाचा कारखाना बांधण्याचें काम चीन सरकारनें सुरू केलें आहे. तिबेटमध्यें बांधण्यांत येत असलेला हा पहिलाच पोलादाचा कारखाना आहे. तिबेटच्या औद्योगीकरणाच्या कार्यक्रमांतील हें पहिलें पाऊल आहे, असें मानण्यांत येत आहे.

**भारतावरील पुस्तकांची भेट**—स्टॉकहोम (स्वीडन) येथील रॉयल लायब्ररीला भारत सरकारतर्फे भारताविषयीं माहिती देणारीं १६० पुस्तकें भेट म्हणून देण्यांत आलीं. ह्या पुस्तकांत भारताची कला, संस्कृति, तत्त्वज्ञान, वाङ्मय, इतिहास, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र ह्या विषयांवरील पुस्तकें आहेत. स्वीडनच्या पंतप्रधानांनीं देणगीचा साभारस्वीकार केला.

**भूमिहीनांना जमीन**—महाराष्ट्र राज्याचे उपमहसूल मंत्री श्री. एम्. डी. चौधरी ह्यांनीं असें जाहीर केलें आहे कीं महसूल खात्याकडे असलेली १३,००० एकर पडीत जमीन अहमदनगर जिल्ह्यांतील २,००० भूमिहीन कुटुंबांना वांटून देण्यांत येईल. जमिनीचें वांटप १५ जून पूर्वी पुरें करण्यांत येणार आहे. त्यासाठीं निरनिराळ्या तालुक्यांतून वांटप केंद्रें उभारण्यांत येणार आहेत.

**टागोरांच्या स्मृतिनिमित्त नाट्यगृह** — राजस्थान राज्याच्या टागोर शताब्दि स्मारक समितीची बैठक अबू येथें भरली होती. कविवर्य रवींद्रनाथ टागोर ह्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ जयपूर येथें एक भव्य नाट्यगृह बांधण्याचें समितीनें ठरविलें आहे. नाट्यगृहाचा तपशील ठरविण्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत आली आहे. नाट्यगृहांतील हवामान सुखद राखण्याची सोय करण्यांत येणार आहे.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ६१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.